# दलित संघटना, महिला संघटना अत्याचारा संदर्भात एस.पी.साहेबांची भेट घेणार

## बाकीच्यांना काही सोयरसुतक नाही का?

MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक – दिपक थोरात

- दुसऱ्या पोलीस अधिकाऱ्यांकडून संबंधित गुन्ह्याचा तपासासाठी पोलिसांनी चक्र फिरविणे गरजेचे?
- हनुमंत उगले चा फोन कॉल डिटेल मध्ये सर्व गुन्ह्याचा तपास उघडा होईल?
- पीआय मंदिराज फौजदार उबाळे कॉन्स्टेबल उगले यांच्या फोनची सफल चौकशी होणे गरजेचे?
- दैनिक महाराष्ट्र आरंभ शेवटपर्यंत पाठपुरावा करणार?
- पेठ बीड पोलीस ठाण्याचे पिया अशोक मंदिरात फौजदार रमेश उबाळे पाठवा? .
- पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांची भेट घेऊन सखोल चौकशीची मागणी?
- डीवायएसपी विश्वंभर गोल्डे यांनी या प्रकरणात सूत्र हाती घेतल्याची माहिती समोर येत आहे?

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –३०० | मंगळवार दि.२३ जुलै २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -300 | TUESDAY DT. 23 JULY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# संगीताताई, 'लेखी'पेक्षा 'लेकी' महत्वाच्या नाहीत का?

## बहिण भाऊ म्हणून धनु भाऊ पंकजाताई, मातंग समाजाच्या भोळसर मनोरुग असलेल्या बलात्कार झालेल्या बहिणीला न्याय द्यावा?









बीड /प्रतिनिधी

कथित भोळसर मनोरुग्न असलेल्या मातंग समाजाच्या मुलीवर बलात्कार अत्याचारात संदर्भात बलात्काराचा गुन्हा पेठ बीड पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीच्या विरोधात कोणत्या आधारावरती दाखल केला. पेठ बीड पोलीस प्रशासना ने उत्तर द्यावे. हनुमंत पीआय अशोक मुदिराज हनुमंत उगले, रमेश उबाळे, यांनी हनुमंत उगले यात पोलीस कॉन्स्टेबलला फिर्यादी का केले ही सखोल चौकशी होणे गरजेचे आहे हनुमंत उगले हा फिर्याद देण्यासाठी डीवायएसपीचा आदेश येऊन सुद्धा टाळ करत होता मध्यरात्री गुन्हा दाखल झाला आहे मात्र यावेळी पेठ बीड पोलिसांच्या नाकर्तेपणाचा कळस व पापाचा घडा या ठिकाणी भरला असून या अगोदर सुद्धा एका लहान मुलांच्या खुणामध्ये पोलिसांनी त्याच्या आईलाच आरोपी करून टाकले त्या तारे तोडले आहेत संबंधित प्रकरणांमध्ये आई–वडील हे मिळून ती फाईल ओपन करण्याची मागणी करणार असल्याची सूत्रांची माहिती आहे पेठ बीडच्या या घटनेच्या संदर्भामध्ये बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे व पंकजाताई मुंडे यांनी की बालकल्याण महिला कल्याण मंत्री पद चांगल्या पद्धतीने चालवून महिलांना बालकांना न्याय दिला अशा पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडे यांच्या बीड जिल्ह्यामध्ये संबंधित घटना घडत आहे पोलिसांना आदेशित करून संबंधित जोशी पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात यावं अशी मागणी यावेळी बीड जिल्ह्यातील करण्यात येत आहे नक्कीच पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडे यांच्याकडून यांना न्याय मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

### पेठ बीड पोलीस ठाण्याचे पीआय अशोक मुदिराज रमेश उबाळे, हनुमत उगले यांना ता निलंबित करण्यात यावे?

पेठ बीड पोलीस स्टेशनचे पिया अशोक मंदिराज कोणत्या कारणाने सुट्टीवर अशोक मंदिरात हजार रमेश उबाळे पोलीस कॉन्स्टेबल हनुमंत उगले यांना तात्काळ निलंबित करा मुख्य सूत्रधार हनुमंत उगले यांनी आर्थिक तरतुदी कशी केली कोण पोलीस मित्र होता याच्या सांगण्यावरून आरोपी सोडले महाराष्ट्र कार्यालयात येऊन संबंधित पोलीस मित्र असलेल्या व्यक्तीला फोन लावला तपासणीची गरज

**महिला आयोगाचे अध्यक्ष रूपालीताई चाकणकर यांचे शी संपर्क करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांचे पीए असलेले प्रतीक पटेल हे सांगत आहेत की ताई रूपालीताई चाकणकर या कार्यक्रमात बिझी आहेत नंतर फोनवर बोलू राहण्यासाठी वेळ आहे का असा प्रश्न पडला आहे चाकणकर यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा देऊन संबंधित पिढीतील न्याय द्यावा अशी मागणी यावेळी नागरिकांकडून करण्यात येत आहे**

- पी आय अशोक मुदिराज फौजदार रमेश उबाळे हनुमंत उगले यांना सक्तीचा रजेवर पाठवा चौकशी होईपर्यंत पोलीस स्टेशनमध्ये हस्तक्षेप होऊ नये म्हणून गरजेचे?
- महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपालीताई चाकणकर कार्यक्रमात व्यस्त महिला महिला आयोगाच्या सदस्य संगीता ताई चव्हाण म्हणतात लेखी द्या मी कारवाई करायला सांगते
- पेठ बीड पोलीस स्टेशन ने आपल्या तारे तोडले पैसे घेऊन नराधम आरोपींना सोडणाऱ्या हनुमंत उगलेलाच फिर्यादी करून केस ढिल्ली करण्याचा प्रयत्न?
- पेठ बीड पोलीस स्टेशनचे पीआय अशोक मुदिराज अचानक रजेवर का हनुमंत उगलेलाच फिर्यादी का केले
- पेठ बीड पोलीस ठाण्याचे फौजदार रमेश उगले यांनी रात्री ग्रस्त घालत असताना नेमका काय प्रकार घडला हा मीडियासमोर येऊन सांगावे
- डायल ११२ वर कॉल आला आणि संबंधित आरोपींना चोरांच्या अफेमुळे गस्त घालणाऱ्या प्रकाश आंबेडकर मधील लोकांनी पकडून दिले याच्यापेक्षा मोठा पुरावा काय असू शकतो
- घटनास्थळी चे फोटो आणि व्हिडिओ दैनिक महाराष्ट्र आरंभ च्या हाती
- पेठ बीड पोलीस यांच्याकडे असलेल्या मनोरुग्न बोईसर मुलीच्या बलात्काराचा गुन्हा चा तपास हा दुसऱ्या अधिकाऱ्यांकडे व पिंक पथकाकडे का दिला नाही

### महिला आयोगाच्या सदस्य व बीडच्या

बीड जिल्ह्याच्या नेत्या व शिवसेनेच्या जिल्हाध्यक्ष संगीता ताई चव्हाण यांच्याशी सायंकाळी महाराष्ट्र यांनी संपर्क केला असता त्यांनी सांगितले की मला तुम्ही लेखी स्वरूपात त्यांनी कारवाई करायला सांगते परंतु महिला आयोगाच्या सदस्य व शिवसेनेच्या नेत्या स्वतःला डॅशिंग समजणाऱ्या संगीता ताई चव्हाण यांनी मात्र यावेळी तारे तोडले आहेत त्यांचा असं म्हणणं आहे की मला लिखित स्वरूपात द्या एका पेपरच्या संपादकाला त्यांनी किशोर पद मागून जर पेपरला आलेली बातमी आणि पोलीस स्टेशनला झालेला गुन्हा दाखल यावरून संबंधित पीडित मातंग समाजाच्या मनोरुग्ण होळकर मुलीवर अत्याचार झाल्यानंतर त्या मुलीची व तिच्या परिवाराची भेट घेण्यासाठी महिला आयोगाच्या सदस्य संगीता ताई चव्हाण यांना वेळ नाही तर त्यांनी या ठिकाणी मात्र अकलेचे तारे तोडू नये त्यांनी आपल्या पदाचा तात्काळ राजीनामा द्यावा अशी मागणी बीड जिल्ह्यातील जनतेच्या वतीने व मातंग समाजाच्या वतीने करण्यात येत आहे.

**घटना १८ जुलैला घडली आणि २३ जुलैला मेडिकल साठी पोलिसांना वेळ मिळाला अंबाजोगाईच्या स्वराती रुग्णालयात मुलीला घेऊन पेड बीड पोलीस ठाण्याचे पथक मेडिकल साठी रवाना झाले आहे. त्या मुलीचा मेडिकल झाले असल्याची कल्पना सायंकाळी महाराष्ट्र आरंभ ला एका पोलीस कर्मचाऱ्यांनी दिली आहे**

**पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी पोलिसांना गुन्हा दाखल करायला आदेशित केले गुन्हाही दाखल झाला परंतु ज्या पोलिसाला फिर्यादी केले आहे त्यांनीच आरोपी सोडून दिले?**

**महिला आयोगाचे अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी तात्काळ राजीनामा देऊन पीडित मुलीस न्याय द्यावा?**

**रूपालीताई चाकणकर अजित पवारांच्या पक्षांमध्ये मध्ये माणसंजोढण्यासाठी पदाचा वापर करत आहेत?**

**महिला आयोगाच्या सदस्य संगीता चव्हाण यांनी आपल्या पदाचा राजीनामा देऊन पीडित मुलीचे न्याय द्यावा?**

बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे व पंकजाताई मुंडे तत्कालीन महिला व बालकल्याण मंत्री यांचे जिल्ह्यामध्ये घडलेला प्रकार आहे परंतु राजकारण बाजूला ठेवून माननीय पालकमंत्री धनंजय मुंडे व तत्कालीन माजी पालक मंत्री व महिला व बालकल्याण ण मंत्री पदाला चांगली कामगिरी करणाऱ्या पंकजाताई मुंडे यांनी बीड जिल्ह्याची लेख म्हणून या मूकबधिर मातंग समाजाच्या वेड्या भोईसर मुलीला न्याय देण्यासाठी संबंधित पोलीस यंत्रणेला व शेड बीड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अशोक मंदिरात फौजदार रमेश उबाळे व हनुमंत उगलेला निलंबित करून सफल चौकशी करावी व संबंधित चौकशी प्रकरण हे बीड जिल्ह्यातील वेगवेगळ्या पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करून घेण्यात या विवाह पिढीतील न्याय द्यावा ही मात्र समाजाच्या व बीड जिल्ह्यातील वेगवेगळ्या जाती धर्मातील लोकांची भावना पंकजाताई मुंडे व जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडून मागणी होत आहे.

**खासदार बजरंग सोनवणे यांनी दलित मुस्लिम समाजावरती खासदारकी मिळवली मात्र या समाजातील आजच्या परिस्थितीमध्ये पाहतात खासदार बजरंग सोनवणे हे पाठ फिरवण्याच्या परिस्थितीमध्ये दिसून येत आहेत खासदार भजन सोनवणे यांना बीड शहरांमध्ये झालेल्या मातंग समाजाच्या मनोरुग्न असलेल्या मुलीवरती बलात्काराचे प्रकरण माहीत नसेल का याचीही माहिती मीडियातून बजरंग सोनवणे घ्यावी तर यावेळी विशाळगड येथील मुस्लिम समाजावर झालेला अतिक्रमणाच्या नावाखाली हल्ला ही बजरंग सोनवणे यांना माहिती नसल्याची चर्चा बीड जिल्ह्यामध्ये ऐकायला मिळत आहे परंतु बजरंग सोनवणे यांच्या मुळे एखाद्याला न्याय मिळत असेल तर बजरंग सोनवणे न्याय द्यावा.**

बीड १८ जुलै रोजी रात्री साडेअकरा वाजता घडलेले संबंधित मातंग समाजाच्या बोळसर मनोरुग्ण असलेल्या मुलीवर अत्याचार झाला आहे परंतु पेठ बीड पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे फिर्यादी ज्या पोलीस कर्मचाऱ्यांनी आरोपी नराधमांना सोडून दिले आहेत त्याच हनुमंत उगले पोलिसांला फिर्यादी केले आहे

पेठ बीड पोलीस ठाण्याच्या अशोक मंदिराचे रजेवर जाऊन त्यांनी खेळ करून करण्यात आलेल्या आहे पोलिसांनी असल्याचे कार्य सोडून मात्र हा गुन्हा पिंक पथकाकडून दाखल करता स्वतः पोलीस स्टेशनमध्ये हा गुन्हा ठेवण्यात आला आहे हा गुन्हा वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्याकडून करण्यात यावा अशी मागणी यावेळी पोलीस प्रशासनाकडे बीड जिल्ह्यातील जनतेतून करण्यात येत आहे

# महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितिच्या वतीने दोन्हीही उपमुख्यमंत्र्यांचा वाढदिवस साजरा!

## वाढीव टप्पा जीआर तात्काळ काढावा आणि १५ मार्च २०२४ चा जाचक संचमान्यतेचा आदेश रद्द करण्याची मागणी

**बीड ।प्रतिनिधी**

**कायम विनानंद शाळा कृती समितीच्या बीड जिल्ह्याच्या वतीने काल शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालया समोर दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचा वाढदिवस साजरा करून लवकरात लवकर विनाअनुदानित शाळांना वाढीव टप्पा देण्याच्या संदर्भातला शासन अध्यादेश काढून जून महिन्यातील टप्पा वाढीचे वेतन आम्हा शिक्षकांच्या खात्यात देऊन सर्व शिक्षकांना मोठा दिलासा द्यावा अशी मागणी यावेळी केली. या बाबत अधिक माहिती अशी की, राज्यातील विनाअनुदानित असणाऱ्या शाळेत हजारो शिक्षक कार्यरत आहेत. या शिक्षकांनी शेकडो आंदोलन केल्यानंतर शासनाने टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याचे जाहीर केले त्यानुसार राज्यातील बहुतांश शाळा २० ४० आणि ६० टक्के अनुदानावर काम करत आहेत.**

या शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांचे सेवानिवृत्त होण्याची वेळ आली आहे. परंतु अद्याप ही या शाळांना शंभर टक्के अनुदान मिळालेले नाही. या शाळेतील शिक्षक प्रचलित नियमानुसार शंभर टक्के अनुदानासाठी सातत्याने आंदोलन करत आहेत. मागच्या दिवाळीच्या सुट्ट्यात लाखो शिक्षकांनी आझाद मैदानावर ती १००% अनुदानासाठी आंदोलन केले होते. तेव्हा सध्याच्या शिक्षणमंत्र्यांनी एक जानेवारी २०२४ पासून अनुदानाचा पुढील टप्पा देऊ असे लेखी आश्वासन दिले होते. परंतु त्यानंतर शासनाने भूमिका बदलली. त्यानंतर कायम विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षणमंत्री आणि मुख्यमंत्री यांच्याशी सातत्याने संपर्क साधून आपण दिलेला शब्द पाळावा, आम्हाला टप्पा वाढ



द्यावी अशी मागणी केली. सातत्याने मागणी करून देखील तातडीने निर्णय होत नसल्याने कृती समितीच्या वतीने काळ्या फिती लावून अध्यापनासह सर्व कामे करण्याचे राज्यात तीव्र आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाची दखल घेत शिक्षण मंत्र्यांनी पावसाळी अधिवेशनात टप्पा वाढ ची घोषणा करू असे आश्वासित केले. शासनाच्या वतीने १२ जुलै २०२४ रोजी शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी पावसाळी अधिवेशनात जून २०२४ पासून वाढीव २० टक्के टप्पा देण्याची घोषणा केली. परंतु मागील काही अनुभव पाहता शासनाने वेळोवेळी फक्त घोषणा करून या शिक्षकांची वेळोवेळी फसवणूक केली आहे. त्यामुळे पुढील अनुदानाचा टप्पा आत्ताच देत जून महिन्यातील टप्पा वाढीचा पगार शिक्षकांच्या खात्यावर द्यावा या मागणीसाठी राज्यातील शिक्षकांनी विविध आंदोलन करण्यास सुरुवात केली. याच आंदोलनाचा एक भाग म्हणून काल राज्यात राज्याचे दोन्ही जिम्मेदार उपमुख्यमंत्र्यांचा वाढदिवस होता.

या वाढदिवसाचे औचित्य साधून बीड जिल्ह्यातील कायम विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिका-यांनी शिक्षणाधिकाऱ्यांच्या दलानासमोर दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या फोटो समोर केक कापून वाढदिवस साजरा केला. यावेळी सर्व पदाधिकाऱ्यांनी दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या निरोगी आयुष्यासाठी शुभेच्छा देताना परमेश्वर या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना शिक्षकांचे प्रश्न तातडीने सोडवण्याची आणि विनाअनुदानित शाळांना प्रचलित नियमानुसार टप्पा वाढ देऊन जून महिन्यातील टप्पा वाढीचे वेतन प्रत्येक शिक्षकांच्या खात्यावर जमा करण्याची सद्बुद्धी देवो अशी प्रार्थना सर्व शिक्षक पदाधिकाऱ्यांनी केली.

यावेळी कायम विनाअनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे, औरंगाबाद विभाग कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, मराठवाडा विभागीय महिला आघाडीच्या सचिव मुक्ता मोटे मॅडम, बीड जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ सर, जिल्हा उपाध्यक्ष जामकर सर, सुरेश कदम (मामा), स्वराज्य शिक्षक संघटनेचे अध्यक्ष दत्तात्रय चव्हाण सर, दुसरे पदाधिकारी काजळे सर, नागरगोजे सर, मुंडे सर यांच्यासह जिल्ह्यातील कृती समितीचे सदस्य व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**अंबाजोगाई ।प्रतिनिधी**

**गुरुपौर्णिमा निमित्ताने दादाराव कराड विद्यालयात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गुरू आज्ञापालन गुरूदक्षिणेचे मोल उलगडून सांगणाऱ्या नाटिकेस प्रतिसाद मिळाला. नंतर विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून गुरूची महती विषद केली. प्राचार्य रामराजे कराड यांनी 'विद्यार्थी जीवनात गुरूचे अनन्य साधारण महत्त्व असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे स्वागत केले. गुरूवंदना सरस्वती स्तवनाने कार्यक्रमाचा प्रारंभ तर पसायदानाने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.**

# ऐकतावादी रिपाई चा भव्य कार्यकर्ता संवाद मेळावा चोरंबा येथे संपन्न

बीड ।प्रतिनिधी

चोरंबा तालुका धारूर येथे बीड जिल्हा अध्यक्ष शैलेंद्र पोटभरे यांच्या उपस्थितीत रिपाई एकतावाचा कार्यकर्ता संवाद मेळावा संपन्न. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादीचा धारूर तालुका कार्यकर्ता संवाद मेळावा आयोजन केले होते. या मेळाव्यास प्रमुख उद्घाटक म्हणून रिपाई बीड जिल्हा अध्यक्ष शैलेंद्र पोटभरे हे उपस्थित होते. या मेळाव्यास आपले विचार व्यक्त करताना पोटभरे म्हणाले की,परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाचे ध्येय धोरण आणि विचार घराघरांमध्ये गावोगावी पोहोचण्याचं काम रिपाई च्या कार्यकर्त्यांनी केलं पाहिजे आपल्या समाजाचे अनेक मूलभूत प्रश्न तसेच रखडलेले असून या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी येणाऱ्या काळामध्ये आपल्याला व्यापक



**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचारधार देशाला मजबूत व अधिक विकसित करू शकते - शैलेंद्र पोटभरे**

लढा उभा करावा लागेल या साठी सर्व समाज बांधवांनी आपसातील मतभेद बाजूला ठेवून संघटित होणे गरजेचे आहे. आज तयागत आपल्या समाजाचे अनेक मूलभूत प्रश्न आहेत त्या प्रश्नाचे सोडवून केल्याशिवाय आम्ही स्वस्त बसणार नाहीत असा विश्वास समाजाला त्यांनी या मेळाव्या प्रसंगी दिला या वेळी रिपाईच्या शाखेचे नाम फलकाचे अनावरण त्यांच्या हस्ते करण्यात आले धारूर तालुक्यात गाव तिथे रिपाईची शाखा स्थापन झाली पाहिजे असे ते म्हणाले, या कार्यक्रमास बीड जिल्हा ऊसतोड मजूर संघटनेचे युवा अध्यक्ष मनोज जोगदंड बीड जिल्हा उपाध्यक्ष डी एस तूपसमुद्र परळी तालुका अध्यक्ष संजय भद्रे धारूर ता.कार्याध्यक्ष आबासाहेब जावळे केज ता.युवा अध्यक्ष अक्षय कांबळे अंबाजोगाई ता. युवा अध्यक्ष आदित्य जोगदंड परळी तालुका युवा अध्यक्ष विनोद घुमरे परळी ता. उपाध्यक्ष सुनील भाऊ कांबळे परळी ता कार्याध्यक्ष एकनाथ उजगरे किरण शिंदे साहेबराव शिंदे या मेळाव्याचे आयोजन धारूर युवा ता.कार्याध्यक्ष संतोष जावळे यांनी केले होते या कार्यक्रमास तालुक्यातील बहुसंख्ये कार्यकर्ते उपस्थित होते.


# गावाला नियमित स्वच्छ पाणी पुरवठा होण्यासाठी गावातील पाणी पुरवठा व स्वच्छता समित्या सक्षम होणे गरजेचे

## जिवन प्राधीकरण सेवा निवृत्त अभियंता मधुकर वाघ

किल्ले धारूर ।प्रतिनिधी

गावाला नियमित स्वच्छ पाणी पुरवठा होण्यासाठी गावातील पाणी पुरवठा व स्वच्छता समित्या सक्षम होणे गरजेचे आहे असे प्रतीपादन महाराष्ट्र जिवन प्राधीकरण चे सेवा निवृत्त अभियंता मधुकर वाघ यांनी धारूर येथे युवा ग्राम विकास मंडळच्या पुढाकाराने काळूचीवाडी आणि आईचा तांडा येथील पाणी पुरवठा आणि स्वच्छता समितींच्या सदस्यांचे क्षमता बांधणी प्रशिक्षणात मार्गदर्शन करताना केले.

युवा ग्राम विकास मंडळ आयोजित शुद्ध पिण्याचे पाणी प्रकल्प अंतर्गत पाणी पुरवठा व स्वच्छता समिती सदस्यांचे क्षमता बांधणी प्रशिक्षण संपन्न झाले. प्रशिक्षणाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार अनिल महाजन हे तर कार्यक्रम उद्घाटक डॉ. हनुमंत सौदागर हे होते यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणूण महाराष्ट्र राज्य जीवन प्राधीकरण चे सेवानिवृत्त शाखा अभियंता मधुकर वाघ , युवाग्रामचे अध्यक्ष बी. के. कापरे , पिंपरवडा आईचातांडा ग्रामपंचायत चे सरपंच विश्वनाथ तिडके . तरनळी काळूचीवाडी ग्रामपंचायत चे सरपंच महादेव खेडकर , ग्रामसेवक शशिकांत साखरे , प्रकल्प समन्वयक संतोष रेपे इ. उपस्थित होते.





क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रशिक्षणाला सुरवात करण्यात आली. प्रकल्प समन्वयक - संतोष रेपे यांनी प्रास्ताविकातून प्रकल्पाचे ध्येय आणि उद्धिष्ठ व पूर्ण झालेल्या कामाचा अहवाल सांगितला. उदघाटनपर भाषणात डॉ. हनमंत सौदागर यांनी आपल्या मार्गदर्शनातून गावात कोण कोणत्या समित्या कार्यरत असतात. पाणी पुरवठा व स्वच्छता समिती गावात काय काम करते, ही समिती स्थापन करणे का महत्वाचे आहे गाव पाणीपुरवठा व स्वच्छता समितीची भूमिका काय? गावातील पाणीपुरवठ्याची जबाबदारी कोणाची? गाव स्वच्छ करण्याची जबाबदारी कोणाची? पाणीपुरवठ्यावर कोणाचे नियंत्रण आहे? यावर सविस्तर मार्गदर्शन केले. प्रमुख मार्गदर्शक मधुकर वाघ यांनी पाणी पुरवठा सिमिती कर्तव्य आणि जबाबदाऱ्या सांगत पाणी पुरवठा योजना - देखभाल व दुरुस्ती तांत्रिक बाबी, विहीर व बोर पुनर्भरण उपाय योजना शोषखड्डे महत्व , डासमुक्त गाव रूप वाटर हार्वेस्टीगच्या महत्वावर डिजिटल माध्यमाद्वारे दृष्टीक्षेप टाकला.कार्यक्रमाचे अध्यक्ष अनिल महाजन यांनी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनातून गावातील पाणी पुरवठा आणि स्वच्छता समिती आणि पाणी वापर गट यांची पिण्याच्या पाण्याबाबत भूमिका सांगत गावातील पिण्याच्या पाण्याची वर्तमान परिस्थितीची ओळख, ग्रामीण भागातील पाण्याचे उपलब्ध स्त्रोत आणि क्षेत्रे, गावांमध्ये कपडे धुण्याची स्थिती, ग्रामीण भागातील आरोग्य, सुरक्षित पिण्याच्या पाण्याचे महत्त्व / आणि त्या बाबत आपल्या जबाबदा-या, सार्वजनिक ठिकाणी सुरक्षित पिण्याच्या पाण्याची गरज शाळा, मंदिर, अंगणवाडी आणि इतर पिण्याच्या पाण्यासाठी १० वर्षात तुम्ही तुमच्या गावाचा अंदाज कसा घ्याल? पिण्याच्या पाण्यासाठी आदर्श गाव बनवण्यात तुमची कोणती भूमिका असेल यावर सखोल मार्गदर्शन केले.

या एक दिवशीय प्रशिक्षणाचे सूत्रसंचालन प्रकाश काळे यांनी केले तर हे प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी सचिन आडे, महादेव खेडकर, विश्वनाथ तिडके, संभाजी वळशे, विनोद सारुख, जनक सानप इतर कर्मचारी यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

# ब्रम्हगावात साहित्यरत्न अण्णाभाउ साठे सार्वजनिक जन्मोत्सवाचे आयोजन

## पालकमंत्री ना. मुंडे, डॉ. आवाड यांची उपस्थिती कार्यक्रमास उपस्थित रहावे - आयोजक अनिल राधे कांबळे

माजलगाव ।प्रतिनिधी

शहरापासुन जवळच असलेल्या ब्रम्हगाव येथे लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाउ साठे सार्वजनिक जन्मोत्सव २०२४ चे आयोजन ब्रम्हगाव येथे करण्यात आले असुन कार्यक्रमास उद्घाटक म्हणुन पालकमंत्री ना. धनंजय मुंडे तर अध्यक्षस्थांनी मानवी हक्क अभियानचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मिलींद आवाड यांची उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक अनिल राधे कांबळे यांनी केले आहे.

लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाउ साठे सार्वजनिक जन्मोत्सवात दि. २८ जुलै रोजी सायं. ६.०० वाजता गायिका कडुबाई खरात व शाहीर युवराज ढगे आणि संच यांचा गायनाचा कार्यक्रम तर दि. १ ऑगस्ट सकाळी १०.३० वा. भव्य मोटारसायकल व ऑटोरिक्षा रॅली छत्रपती संभाजी महाराज चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे अनिल राधे मित्र परिवाराच्या वतीने काढण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणुन पालकमंत्री ना. धनंजय मुंडे तर अध्यक्षस्थांनी मानवी हक्क अभियानचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मिलींद आवाड यांची उपस्थिती असणार आहे तर विशेष उपस्थितीत वाल्मीक कराड, आ. प्रकाश सोळंके, ओमप्रकाश शेटे, नितीन नाईकनवरे बाबुराव पोटभरे, बाबरी मुंडे, राम राठोड, डॉ. सुरेश साबळे, शिवाजी रांजवण, मंजुर शेख, सभापती जयदत्त नरवडे, कल्याण आबूज, दिपक मेंडके, सुशिल डक,



बिलाल चाउस, सचिन सानप, विठ्ठल तुपसौंदर, डॉ. दिनकर मस्के, पद्माकर कांबळे, कचरू कांबळे यांची उपसिथती असणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक तथा उपसरपंच अनिल राधे कांबळे, संयोजक ग्रा. पं. सदस्य अंजन कांबळे, जन्मोत्सव अध्यक्ष विक्रांत कांबळे, उपाध्यक्ष प्रविण कांबळे, सचिव संकेत कांबळे, सहसचिव युवराज कांबळे, कोषाध्यक्ष मनोज गायकवाड, सह कोषाध्यक्ष अमोल खंडागळे यांचेसह अनिल राधे मित्र परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त

# सेवानिवृत्त एलआयसी अधिकारी आदिनाथ सोनवणे यांचे अध्यक्षतेखाली आयोजन बैठक संपन्न

बीड ।प्रतिनिधी

शहरातील नगरसेवक भैय्यासाहेब मोरे यांच्या संपर्क कार्यालय धानोरा रोड येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ वी जयंती निमित्त होणाऱ्या कार्यक्रमांचे आयोजन निमित्त सेवानिवृत्त एल आय सी अधिकारी आदिनाथ सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली.



सर्वानुमते जयंती चे अध्यक्षपदी आकाश मडावी यांची नियुक्ती करण्यात आली.जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवून व मिरवणूक काढून जयंती साजरी करण्याचे ठरवण्यात आले.या बैठकीस भागातील प्रतिष्ठित नागरिक व समाज बांधव मोठया प्रमाणावर उपास्थित होतें.



**बीड - शहरातील मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांना नुकतेच दैनिक प्रभास केसरी कडून राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या प्रित्यर्थ एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफीक भाऊ यांनी पक्षाच्या मुख्य कार्यालयात त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी पक्षाचे जिल्हा समन्वयक तथा प्रसिद्धी प्रमुख सय्यद सैफ अली उर्फ लालू भैय्या, शेख मुदस्सीर, सय्यद अमन आणि इतर कार्यकर्ते उपस्थित होते.**

# महिला आयोगाचे अध्यक्ष रूपाली चाकणकर फक्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पाठीमागे आमदारकी करिता फिरण्यासाठीच का ? - प्रा सौ विद्याताई जाधव पाटील

## पेठ बीड पोलिसांचा नाकर्तेपणा अल्पवयीन बोळसर मुलीवर बलात्कार करणाऱ्या नराधमांना सोडून दिलं ?

बीड ।प्रतिनिधी

जिल्ह्यासह महाराष्ट्रात अल्पवयीन मुलींवर आणि महिलांवर सामूहिक बलात्कारासारख्या विचित्र घटना घडत आहेत महिला आयोगाचे अध्यक्ष रूपाली चाकणकर मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पाठीमागे पुढे आमदार होण्यासाठी फिरत आहेत रूपालीताई तुम्ही महीला आयोगाच्या अध्यक्ष आहेत अजित दादा गट पक्षाच्या प्रवक्त्या नाहीत याच्या त्याच्यावर टीका करणं भाषण बाजी करण्यापेक्षा महिला अत्याचारावर काम करा अन्यथा महिला आयोगाचे अध्यक्ष पद सोडून द्या अल्पवयीन महिला व मुलींवरील अत्याचार रोखण्यासाठी त्यावर कारवाई करण्यासाठी तुम्हाला लाखो रुपयांचा निधी आलिशान गाड्या आणि हाय प्रोफाईल लाईफ मिळते याचा उपयोग हा पीडित आणि वंचित उपेक्षित महिलांवर होणाऱ्या अन्याय अत्याचार रोखण्यासाठी करा पक्ष वाढवण्यासाठी किंवा तुम्हाला स्वतःला आमदार होण्यासाठी सरकारी संपत्तीचा उपयोग करू नका महिन्याला मिळणारा भत्ता मिळणारा पगार शासन पीडित अल्पवयीन मुलींसाठी आणि त्यांचे अत्याचार थांबवण्यासाठी करा शासन तुम्हाला डिझेल पासून ते पी ए च्या पगारापर्यंत फोन रिचार्ज पासून ते हॉटेलच्या राहण्यापर्यंतचा खर्च देत आहे तुम्ही मात्र पक्ष वाढीसाठी शासनाच्या पैशाचा उपयोग करत आहात

बीड जिल्ह्यामध्ये माजलगाव मध्ये अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून तिचा कोणताही मेडिकल न करता तिला मतिमंद विद्यालय मध्ये पोलिसांनी प्रवेश मिळवून दिला बलात्कारानंतर तिच्या शरीराची मेडिकल तपासणी करणे गरजेचे होतं उपचार करणे गरजेचे होतं परंतु ते पोलिसांनी गरजेचे समजलं नाही तसेच पेठ बीड हद्दीमध्ये पाण्याच्या टाकीच्या जवळ एका भोळसरी मुलीवर सामूहिक बलात्कार करून बलात्कार करणाऱ्या आरोपींना समस्त जमावाने पकडून चोप दिला आरोपी पकडून पोलिसांच्या स्वाधीन दिले पोलिसांनी मात्र आर्थिक तडजोडीतून आरोपींना सोडून पीडित मतिमंद मुलीला बीडच्या निवारागृहामध्ये आणून टाकले दुसऱ्या दिवशी तिथून मुलगी कुठे गेली काहीच पत्ता नाही अशा घटना बीड जिल्ह्याच्या नावाला काळीमा फासत आहे परंतु बीड जिल्ह्यातील महिला बालकल्याण समिती असेल किंवा महिला आयोग अध्यक्ष रूपाली चाकणकर या अजित दादा गट वाढवण्यासाठी बीड पासून मुंबई पर्यंत मीटिंग घेत आहेत बैठका घेत आहेत माजलगाव मध्ये ज्या मुलींवर बलात्कार करून प्रकरण पोलीस स्टेशनला



तडजोड करण्याचा प्रयत्न केला ती मुलगी तर मुंबईची राहणारी आहे अशाने बीड जिल्ह्याचे नाव खराब होत आहे पोलीस प्रशासन असेल किंवा महिला व बालकल्याण समिती असेल किंवा ह्यूमन राइट्स असतील या कोणत्याही संस्थेला या घटनेकडे गांभीर्याने बघू वाटलं नाही त्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतील गृहमंत्री असतील तसेच गृह विभागातील अधिकाऱ्यांनी बीड जिल्ह्याच्या नावाची जी बदनामी चालली आहे ती बदनामी थांबवण्यासाठी व आरोपींवर कठोर कारवाई करण्यासाठी महिला आयोगाचे अध्यक्ष असलेल्या रूपाली चाकणकर यांना पदावरून बाजूला करून त्यांना अजित दादा गटाच्या पक्षाच्या प्रमुख पदावर बसावावे महिला आयोग पदावर बसण्याचा त्यांना कोणताही नैतिक अधिकार नाही आपण एक महिला असून महिलावर होणारा अन्याय रोखू शकत नसाल किंवा तिला न्याय मिळवून देत नसाल तर त्यांना पदावर राहण्याचा तिळ मात्र अधिकार नाही बीड जिल्ह्यातील एवढ्या मोठ्या सामूहिक बलात्काराच्या दोन दिवसांमध्ये दोन घटना घडल्या आहेत महिला आयोगाचे अध्यक्ष ने किंवा महिला बालकल्याण समितीच्या वतीने साधा फेसबुक वरती किंवा सोशल मीडियाच्या माध्यमातून झालेला घटनेचा निषेध सुद्धा व्यक्त करणे कर्तव्य समजलं नाही त्यामुळे आम्ही राष्ट्रवादी युवती काँग्रेस आणि महिला आघाडीच्या वतीने महिला आयोग अध्यक्ष रूपाली चाकणकर आणि महिला व बालकल्याण समितीचा जाहीर निषेध करतोय जिल्ह्यातील पोलीस यंत्रणेचा सुद्धा जाहीर निषेध बीड जिल्ह्यातील या घटनेचे गांभीर्य जर महिला आयोगाचे अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी घेतली नाही तर महिला आयोग कार्यालय समोर निदर्शन करण्याचा इशारा राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या बीड जिल्ह्याचे अध्यक्ष प्रा सौ विद्याताई जाधव पाटील यांनी दिला आहे.

*शहरातील नगर रोडच्या मुख्य रस्त्याचे काम संथ गतीने*

## शिवसंग्राम आक्रमक; काम लकरात लवकर पूर्ण करा अन्यथा तीव्र आंदोलन उभा करु - सुहास पाटील

**बीड ।प्रतिनिधी**

**बीड शहरातील नगर रोड हा मुख्य रस्ता असून ऐन पावसाळ्यात या रस्त्याचे काम सुरू केले मात्र तीन महिने उलटून देखील या रस्त्याच्या कामाला गती मिळत नसल्याने शहरातील नागरिक हवालदिल झाले आहेत. अनेक अपघात या ठिकाणी होत आहेत. शहरातील काम जलद गतीने होणे अपेक्षित होते मात्र त्यास विलंब होत आहे. हे काम लवकरात लवकर पूर्ण करा यासाठी आज बीड शहर शिवसंग्रामच्या वतीने जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना निवेदन देण्यात आले.**



बीड नगर रोडचे काम सध्या अतिशय संथ गतीने सुरू आहे. सर्विस रोड म्हणून या रस्त्याची एक बाजू वापरण्यासाठी येत आहे परंतु या सर्विस रोडवर अतिशय मोठे खड्डे झाल्याने पाणी साचत आहे . त्यामुळे वाहनधारकांना वाहने चालवताना कसरत करावी लागत आहे यात अनेक अपघात देखील घडत आहेत वाहन येत असताना पायी चालले तर या रोडवरती शक्यच नाही अशी परिस्थिती असताना देखील या रस्त्याचे काम अत्यंत संथ गतीने सुरू असून याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे तेव्हा हे काम लवकरात लवकर पूर्ण करा असे निवेदन आज जिल्हाधिकारी यांना शहर शिवसंग्रामच्यावतीने देण्यात आले त्याचबरोबर कामाची गती न वाढल्यास शिवसंग्राम रस्त्यावर उतरेल असेही निवेदनात म्हटले आहे. याप्रसंगी शिवसंग्रामचे बीड शहराध्यक्ष सुहास पाटील,महिला आघाडीचे जिल्हाध्यक्षा ड.मनीषा कुपकर, मनोज जाधव,सातीराम ढोले, गोपीनाथ देशपांडे, राहुल शहागडकर, अनिकेत देशपांडे, नदीम शेख गणी, लालाभाई, मुकुंद गोरे, गणेश धोंडरे,कैलास शेजाळ, अशोक लोकरे, हरिश्चंद्र ठोसर आदी सह शिवसंग्राम पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## पाणंद रस्त्याचे काम पंचवीस पंधरा योजनेतून दाखवत कंत्राटदराने बिल उचलले

आष्टी ।प्रतिनिधी

तालुक्यातील अरण विहिरा ते रामगुडे वस्ती एक किलोमीटर अंतराचा पाणद रस्त्याला मंजुरी मिळाली पण या रस्त्याचे काम सन २०१९-२० मध्ये झालेल्या पंचवीस पंधरा योजनेत दाखवत कंत्राट दराने रस्त्यावर बोगस बिल उचलण्याचा प्रकार गावकऱ्यांच्या लक्षात आला गावकऱ्यांनी पाणंद रस्त्याचे काम अडवत आष्टी येथील तहसीलदार प्रमोद गायकवाड यांच्याकडे थेट तक्रार केली आहे परंतु तहसीलदारांनी मागील दीड महिन्यात कोणतीच कारवाई केली नाही आष्टी तालुक्यातील आष्टी तालुक्यातील आरणविहरा येथे महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत आरणवीर ते रामगुडे वस्ती या रस्त्याची एक किलोमीटर अंतराची काम मंजूर करण्यात आले होते हे काम सन १९ /२० स्थानिक लोकप्रतिनिधीच्या निधीतून लेखाशिर्षखाली पूर्ण करण्यात आले या रस्त्याच्या कामाला तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे २५ लाख रुपयांची अंदाजपत्रक तयार करण्यात आली. रस्त्यावर काम न करता कंत्राटदाराने मुजरा मार्फत काम केल्याचे दाखवून देत देयेके उचलली आहे कुशल ची रक्कम उचलून अपहरण करण्यासाठी मशीन आणून काम दाखवण्याचा प्रयत्न करण्यात आला परंतु हा प्रकार ग्रामस्थांनी हाणून पडला आहे कारवाई केली नाही तर आत्मदहन करण्याचा इशारा देण्यात आला कारणविरा ते रामगुडे वस्ती या कामाची तक्रार देण्यासाठी माझ्यासह ग्रामस्थ आष्टी तहक्षील कार्यालयात आतापर्यंत वीस वेळा गेले आहेत तरी तहसीलदार प्रमोद गायकवाड हे भेटले नाहीत आम्ही दिलेल्या निवेदनावर कसली चर्चा केली नाही येत्या दहा दिवसात कंत्राटदार व अधिकाऱ्यावर कारवाई केली नाही तर आम्ही आत्मदहन करणार आहोत अशी प्रतिक्रिया तक्रारदार उद्धव शिरसाठ यांनी दिली या कामाला बोगस मंजुरी देणारे अधिकारी कर्मचारी त्याचबरोबर कंत्राटदार यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावीत कारवाईने न झाल्यास आष्टी तहसील कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे



जिल्हाधिकारी यांनी कारवाई करावी ग्रामस्थांची मागणी

शासनाने महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत आष्टी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर निधी दिला आहे हा निधी काम न करता उचलण्याचा प्रयत्न अधिकारी व लोकप्रतिनिधी करत असल्याचा दिसुन येत आहे याबाबत जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी असे मागणी गावकऱ्यांनी केले आहे तसे न झाल्यास आम्ही तहसील कार्यालयासमोर आंदोलन करण्यास इशाराही ग्रामस्थांकडून देण्यात आला आहे

## अल्पसंख्यांक मुलींच्या वसतिगृहाच्या विषयात उदासीनता नेमकी कोणाची?

### आ.संदीप क्षीरसागर यांनी उपस्थित केला प्रश्न

बीड।प्रतिनिधी

बीड शहरात अल्पसंख्यांक मुलींसाठी वसतीगृह होण्यासाठीचा प्रस्ताव आ.संदीप क्षीरसागर यांनी तीन वर्षांपूर्वीच शासनाकडे पाठवलेला आहे. याबाबत अजूनही पाठपुरावा सुरू आहे. आवश्यक त्या सर्व बाबींची उपलब्धता जवळपास पूर्ण झालेली असताना या विषयात उदासीनता नेमकी कोणाची? असा प्रश्न आ.क्षीरसागर यांनी उपस्थित केला आहे. तसेच अल्पसंख्यांक समाजातील मुलींच्या दृष्टीने अत्यावश्यक असलेला प्रश्न मार्गी लावण्यात यावा अशी मागणी केली आहे.

बीड विधानसभा मतदारसंघात अल्पसंख्यांक समाजाची लोकसंख्या अंदाजे ७० हजार आणि जिल्ह्याभरात अडीच लाखांपेक्षा जास्त आहे. सद्यस्थितीला जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या सन २०२२ मधील अहवालानुसार बीड शहरातील २५ शाळांमध्ये एकूण ३२४२ अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थीनी शिक्षण घेत होत्या. निश्चितच ही संख्या २ वर्षात वाढलेलीच असणार आहे. समाजातील मुलींच्या शिक्षणासंबंधीत अडचणी दूर व्हाव्यात व एकाच छताखाली विद्यार्थीनींच्या राहण्याची, जेवणाची, अभ्यासाची सुविधा उपलब्ध व्हावी. उच्च शिक्षण घेण्यासाठी अल्पसंख्यांक मुलींना



येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी बीड शहरात वसतीगृह असणे आवश्यक आहे.

मतदारसंघासह

जिल्ह्यातील अल्पसंख्यांक मुलींसाठी सर्व सोयी सुविधांनी परिपूर्ण असलेले वसतीगृह व्हावे अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी तीन वर्षांपूर्वी केली होती. तसेच याबाबत नियमित पाठपुरावाही केला होता आणि सुरू आहे. परंतु या महत्त्वाच्या विषयात प्रशासनाकडून चालढकल करण्यात येत आहे. दोन वर्षांपूर्वीच नगरपालिकेकडून केलेल्या ठरावानुसार बीड शहरातील किल्ला मैदान येथील बलभीम महाविद्यालयाच्या पश्चिम बाजूची नगरपरिषदेच्या मालकीची २००० चौ.मी. जागा संमत झाली आहे. परंतु त्यांनतर नगरपरिषदेच्या मालकीची जागा महसूल विभागाकडे प्रत्यार्पित करण्याबाबतची पुढील कार्यवाही रखडली आहे. त्यामुळे आ.क्षीरसागर यांनी पावसाळी अधिवेशनात दि.२७ जून २०२४ रोजी लक्षवेधी प्रश्न क्रमांक १५९० नुसार हा महत्त्वाचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला होता. तसेच अनेकवेळा तारांकित व अतारांकीत प्रश्नाद्वारे या महत्त्वाच्या विषयावर प्रकाश टाकला आहे. सध्याही या विषयात जिल्हाधिकारी, आणि संबंधित प्रशासन यांच्याकडे आ.क्षीरसागरांचा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. बीडमध्ये अल्पसंख्यांक समाजातील मुलींसाठी वसतीगृह होणे ही बाब समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक उन्नतीसाठी अनिवार्य झालेली आहे. त्यामुळे लवकरात लवकर प्रशासनाने यासंदर्भात पाऊले उचलून बीड शहरात अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थीनींसाठी सुसज्ज वसतिगृह उभे करावे. अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

बीड शहरात 'यामुळे' आहे वसतिगृहाची आवश्यकता

- शिक्षणासाठी शहरात आल्यानंतर भाड्याने घर करुन राहायचे असेल तर भरपूर भाडे द्यावे लागते.
- सुरक्षेचा मोठा प्रश्न असतो.
- शिकत असलेल्या संस्थेजवळच भाड्याने घर उपलब्ध होईल याची शाश्वती नसते.
- दूर अंतरावर घर मिळाले तर येण्याजाण्यासाठी वेगळा खर्च येतो.
- शिवाय जेवणाचा खर्च.

या आणि अशा अनेक अडचणी आहेत. त्यामुळे अल्पसंख्यांक समाजातील मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात राहण्यासाठी मोठी अडचण निर्माण होते. आणि परिणामी दर्जेदार शिक्षण आणि व्यक्तीमत्व विकास तसेच शैक्षणिक आणि सामाजिक विकास यांपासून मुली दूर जातात.



## महसूल कर्मचारी यांचा संप मिटवा मनसेचे गेवराई तहसीलदार यांना निवेदन

गेवराई ।प्रतिनिधी

तहसील कार्यालयात सर्व कर्मचारी यांनी संप पुकारला आहे गेवराई मतदार संघाच्या लोकांना होणारा त्रास महाराष्ट्र नवनिर्माण सेना पाहू शकत नाही. हे निवेदन गेवराई तहसीलदार सोनवणे साहेब यांना देण्यात आले. महसूल कर्मचारी यांचा संप तात्काळ थांबवा त्यांच्या ज्या मागणी आहेत त्या सरकारने निकाली काढाव्यात असी मागणी केली. सध्या आरक्षण साठी लागणारे कागदपत्र तसेच शैक्षणिक विद्यार्थी यांना प्रमाणपत्र शेतकऱ्यांना फेरफार आणी बँक लोन साठी चे कागदपत्र तसेच महिलांना विविध योजनेचे कागदपत्र लागत असताना सलग आठ दिवसांपासून संप सुरु आहे.

हा संप तात्काळ थांबवून लोकांना त्रास होणार नाही याची काळजी घ्या नसता दोन दिवसात तीव्र आंदोलन छेडू असा इशारा मनसे जिल्हा अध्यक्ष राजेंद्र मोटे यांनी दिला. यावेळी तालुका अध्यक्ष जयदीप गोल्हार, वाहतूक तालुका अध्यक्ष सतीश पटाईत, शेतकरी तालुका अध्यक्ष कृष्णा राठोड, तालुका उपाध्यक्ष अशोक नरवडे, विठ्ठल पट्टे , जगन राऊत, तालुका संघटक विकी चव्हाण , शुभम म्हेत्रे, मोहन तौर , समाधान सम्राट, ऋषी कदम, नागेश शिंदे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.



**बीड ।प्रतिनिधी**

**बीड तालुक्यातील नबापूर येथील जिल्हा परिषद शालेय व्यवस्थापन समितीची निवडणूक पार पडली, यावेळी शालेय व्यवस्थापन समितीच्या बिनविरोध अध्यक्षपदी गोरख बाबर यांची निवड करण्यात आली, यावेळी निवडणूक प्रक्रिया दरम्यान शाळेचे मुख्याध्यापक तोगे सर. शिक्षक भोसले सर, अरुण नाना गायवळ, रवींद्र गायवळ ,अशोक बाप्पा गायवळ ,बाळासाहेब गायवळ, कैलास गायवळ बिभीषण गायवळ पांडुरंग गायवळ बलभीम बाबर ,दिनकर गायवळ ,व आधी पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते, यावेळी अध्यक्ष गोरख बाबर यांनी म्हटले आहेत शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध राहणार असल्याचे म्हटले आहे.**

## 'लाडक्या बहिणी'च्या मदतीला धावले 'भाऊ'

### बीड मतदारसंघात डॉ.योगेशभैय्यांचे कार्यकर्ते भरून देतायत लाडकी बहिण योजनेचे अर्ज

बीड (प्रतिनिधी)

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना बीड मतदारसंघातील गावागावात प्रभावीपणे राबविली जात आहे. त्यासाठी शहरासह मतदारसंघातील गावागावात कार्यकर्त्यांकडून शिबिर घेत जाणार आहेत. हा उपक्रम राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, 'कल्पतरू'च्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविला जात असून ठिकठिकाणी योजेनेचे अर्ज भरण्यासाठी 'लाडक्या बहिणी'च्या मदतीला 'भाऊ' धावत असल्याचे चित्र निर्माण येत आहे.

बीड मतदारसंघात महायुती सरकारची महत्त्वाकांक्षी असलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहिणी योजना सर्वत्र राबविली




जात आहे. यासाठी बीड मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांची यंत्रणा कामाला लागली आहे. या योजनेचा जास्तीत जास्त पात्र महिला भगिनींना लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, महिलांसाठी सुरू केलेली ही योजना अत्यंत महत्वाची ठरणार असून योजना सुरू केल्याबद्दल डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, ना.अजितदादा पवार, कृषी मंत्री ना.धनंजय मुंडे, महिला व बालविकास मंत्री ना.आदितीताई तटकरे यांचे आभार मानले आहेत.

लाडकी बहिण योजना प्रभावीपणे राबविणार-डॉ.सारिकाताई क्षीरसागर

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना महत्वाकांक्षी ठरणार आहे. ही योजना बीड मतदारसंघात प्रभावीपणे राबविणार आहोत. योजनेचे अर्ज भरून देण्यासाठी अनेक कार्यकर्ते कामाला लागले आहेत. महिलांनी या योजनेचा लाभ मोठ्या संख्येने घ्यावा. योजना राबविताना येणाऱ्या तांत्रिक अडचणींवर मात करण्यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू आहे.

-डॉ.सारिकाताई क्षीरसागर, सचिव

# जन्माला आलेल्या व्यक्तीला सद्गुरु शिवाय मोक्षप्राप्ती नाही:- श्री गुरु मानूरकर महाराज

## नागनाथ देवस्थान जहागीरदार मठ संस्थान मानूर येथे गुरुपौर्णिमा उत्साहात संपन्न



शिरुरकासार(प्रशांत बाफना)

शिरूर कासार तालुक्यातील मानूर येथे श्री क्षेत्र नागनाथ देवस्थान जहागिरदार मठसंस्थानात गुरू-शिष्य नाते अबाधित राहण्यासाठी प्रति वर्षाप्रमाणे यावर्षीही गुरुपौर्णिमा उत्सव रविवार दि.२१/७/२०२४ रोजी श्री ष ब्र १०८ गुरू विरूपाक्ष शिवाचार्य मानूरकर महाराज यांच्या दिव्य सानिध्यात संपन्न झाला यावेळी महाराष्ट्रासहित परराज्यातून मानूर मठाचे शिष्य सदभक्त हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. गुरुपौर्णिमेनिमित्त मठ संस्थानातील सर्व गुरूसमाधीस लघुरुद्राभिषेक, सद्गुरु नागनाथ महाराज यांना रुद्राभिषेक, गुरु महाराजांची इष्टलिंग महापूजा व शिवदिक्षा संस्कार सोहळा संपन्न झाला यावेळी सुमारे १५० ते २०० शिष्यांनी शिवदिक्षा घेतली. त्याचबरोबर मठाचे शिष्य जे की शासनाच्या अधिकारी पदावर आहेत अशा अनेक गणमान्य व्यक्तींचा सत्कार सन्मान गुरु महाराजांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शिवानंद स्वामी अरणगांव यांनी शिवदिक्षेचे महत्त्व पटवून देताना सर्व धर्मामध्ये प्रत्येक आराध्यला अनन्य साधारण महत्त्व दिलेले आहे परंतु वीरशैव धर्मामध्ये जो जगाचा मालक आहे तो आपल्या गळ्यामध्ये (इष्टलिंग) बांधला जातो म्हणजेच अनेक धर्मामध्ये दर्शन घेण्यासाठी मंदिरामध्ये जावे लागते परंतु वीरशैव धर्मामध्ये मंदिरच व्यक्ती होतो म्हणजेच जीवच शिव होतो याचा मुख्य संस्कार म्हणजे शिवदीक्षा.त्याचबरोबर भूम येथून आलेले अशोक अप्पा तोडकर यांनी वीरशैव धर्म हा ज्ञानदानासाठी आहेच परंतु विज्ञानाला सुद्धा पाठीमागे टाकेल असे संस्कार या धर्मामध्ये आहेत यानुसार आपल्या मठामध्ये असंख्य कार्यक्रम होतात असंख्यभक्त मंडळी येतात आपण सुद्धा समाजाचे काहीतरी देणे लागतो यासाठी अन्नदान करतात त्यानुसार मठामध्ये भविष्याच्या दृष्टीने येणाऱ्या भक्तांना पात्रामध्ये न जेवण करता ताटामध्ये जेवण करता यावे यासाठी आज आपण संकल्प करूया असे मनोगत व्यक्त केले.

वीरशैवधर्मामध्ये जन्माला आलेल्या व्यक्तीला विविध संस्कार अत्यंत महत्त्वाचे असतात त्यामध्ये प्रामुख्याने शिवदीक्षा संस्कार अत्यंत महत्त्वाचा आहे कारण वीरशैव धर्मामध्ये जो व्यक्ती मृत होतो त्या व्यक्तीच्या हातावर इष्टलिंग देऊन त्याची समाधी क्रिया पूर्ण केली जाते अशावेळी जो इष्टलिंग हातामध्ये दिला जातो तो व्यक्तीच्या जन्माच्या अगोदरपासून असतो तोच दीक्षा विधी वेळेला असतो आणि हाच इष्टलिंग हातामध्ये देऊन त्या व्यक्ती समाधी क्रिया केली जाते म्हणून प्रत्येक वीरशैवाने इष्टलिंग,विभूती(भस्म) धारण करणे त्याचबरोबर गळ्यामध्ये रुद्राक्ष माळा धारण करणे आणि आपल्या गुरु मंत्राचा जप करणे अत्यंत महत्त्वाच्या आहे त्याचबरोबर सर्वसामान्य व्यक्तीने आपल्या जन्मामध्ये मोक्ष प्राप्त करून घ्यावयाचे असेल तर आपल्या जीवनामध्ये गुरु मंत्र घेणे अत्यंत गरजेचे आहे कारण गुरुशिवाय मार्ग सापडत नाही आणि गुरुशिवाय आपण मोक्ष पदाला जाऊ शकत नाही. अनेक व्यक्तींना वाटते की जप केल्यानंतर काय फायदा मिळतो परंतु जप केल्यानंतर माणसाच्या मनातील मलीनता दूर होते माणसाच्या मनातील नकारात्मकता निघून जाते आणि सकारात्मक भाव त्या व्यक्तीच्या मनामध्ये निर्माण होतो आणि त्यावेळी आपल्या जीवनामध्ये येणारी असंख्य संकटे ही गुरमंत्राच्या नामस्मरणाने दूर होतात. नामस्मरण करण्यासाठी कोणत्याही ज्ञानाची गरज नसून मनाचा समर्पण भाव महत्त्वाचा आहे, असे उद्गार यावेळी मठाधिपती श्री ष ब्र १०८ गुरु विरूपाक्ष शिवाचार्य मानूरकर महाराज यांनी केले. त्यानंतर सर्व दिक्षार्थी व्यक्तींना गुरूमंत्र देण्यात आला व तीर्थप्रसाद घेत सर्व शिष्य सदभक्तांनी महाप्रसाद घेऊन या गुरूपौर्णिमाची सांगता झाली. कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातून हजारोंच्या संख्येने मानूर मठसंस्थांनचे अनेक शिष्य सदभक्तांनी व मानूर पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थांनी या गुरूपौर्णिमाची कार्यक्रमासाठी आपली उपस्थिती दर्शविली.




## पूर्णवादी बँकेतून ७० लाखाचे बेकायदा कर्जमाफी देणाऱ्या डॉक्टर सुभाष जोशी यांना चेअरमन पदासाठी प्रचंड विरोध?

तेलगाव सोमेश्वर सोनटक्के. भ्रष्ट कारभारासाठी गेल्या अनेक दिवसापासून चर्चेत असलेल्या बीड येथील पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेतील अनेक आर्थिक घोटाळे बाहेर येत असून बँकेचे संचालक डॉक्टर सुभाष जोशी यांचे जवळचे नातेवाईक आणि डॉ. सुभाष जोशी स्वतः या कर्जाला जामीनदार असलेल्या विकास मार्तंड पत्की यांना हरिहर अपार्टमेंट बांधकामासाठी ५० लाख रुपयाचे कर्ज दिले होते त्या कर्जाचे व्याजासह झालेले सत्तर लाख रुपये रक्कम बेकायदा माफ करून बँकेला खड्ड्यात घालणाऱ्या डॉक्टर सुभाष जोशी हे बँकेचे चेअरमन पद आपल्याला मिळावे यासाठी बाशिंग बांधून बसलेले असताना निम्म्याहून अधिक संचालकांचा विरोध असल्याने डॉक्टर जोशी यांचे मनसुबे उधळले जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अधिक व्रतांत असाकी, बीड शहरातील कधीकाळी नावाजलेल्या आणि आता भ्रष्ट कारभाराने राज्यात गाजत असलेल्या पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेतील पदाधिकाऱ्याने घोटाळे करून सामान्य खातेदार ठेवेदार यांच्या विश्वासाला तडा देण्याचे अविरत काम केले आहे. पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेतील जिल्ह्यातील व जिल्ह्या बाहेरील करोडो रुपयाचे झालेले आर्थिक घोटाळे संदर्भात जनता रस्त्यावर येत आहे. पूर्णवादी बँकेचे विद्यमान चेअरमन डॉक्टर अरुण गोविंद निरंतर यांनी बँकेच्या भ्रष्टाचाराचे आरोप सिद्ध झाले तर आपल्या गळ्यात नसलेले झंझट अडकू नये म्हणून तडका फडकी राजीनामा देऊन मोकळे झाले आता दोन दिवसात चेअरमन पदाचची निवड होणार असून बँकेतील डॉ.अरुण निरंतर यांचे नातेवाईक भ्रष्ट संचालक डॉक्टर सुभाष जोशी हे आपणच खुर्चीवर बसावे यासाठी अट्टाहास करत फिरत असल्याचे चित्र दिसत असून त्यांचे नातेवाईक विकास मार्तंड पत्की यांना स्वतः डॉक्टर जोशी यांनी जामीनदार होऊन ५० लाखाचे कर्ज दिले असता त्याचे व्याजासह ७० लाख रुपये झाले असताना देखील डॉक्टर सुभाष जोशी यांनी सदर रुपये सत्तर लाखाच्या कर्ज बेकायदा माफ करून बँकेला आर्थिक दृष्ट्या कंगाल बनवले आहे. बँकेच्या हिताच्या विरोधात कार्य करणारा डॉक्टर सुभाष जोशी यांना चेअरमन पदाच्या खुर्चीवर बसविण्यासाठी एकूण निम्म्याहून अधिक संचालकांचा विरोध तीव्र होत असून कोणीही झाले तरी अनुभवी जुने जाणते संचालकापैकी कोणालाही चेअरमन पदाचे खुर्ची मिळावी परंतु डॉक्टर जोशी यांना या खुर्चीपासून कोसो दूर ठेवावे यासाठी अनेक संचालक मेहनत घेत आहेत त्यामुळे चेअरमन पदाचे स्वप्न पाहणाऱ्या डॉक्टर सुभाष जोशी यांच्या स्वप्न भंग होणार का असा सवाल बीड जिल्ह्यात उपस्थित केला जात आहे.




## वंचितचे गंगाधर सोनपसारे यांचा स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेत जाहीर प्रवेश

माजलगाव ।प्रतिनिधी

तालुक्यातील वंचित बहुजन यूवक आघाडीचे तालुका संघटक गंगाधर सोनपसारे यांनी स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेचे संस्थापक अध्यक्ष विजय साळवे यांच्या नेतृत्वाखाली सेनेत जाहिर प्रवेश केला आहे. तालुक्यातील दलित चळवळीचे खंदे समर्थक तथा सामाजीक कार्यकर्ते गंगाधर सोनपसारे हे गेली अनेक वर्षा पासुन वंचित बहुजन आघाडी मध्ये माजलगाव तालुका संघटक म्हणून समाजकार्य करत होते. माजलगाव मतदार संघात स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेची चळवळ मोठ्या प्रमाणात पुढे येत असून सर्व जाती धर्माचे सामाजिक भान असलेले कार्यकर्ते विजय साळवे यांच्या नेतृत्वाखाली काम करण्यासाठी उत्सुक आहेत मतदार संघात शिव फुले शाहू आंबेडकरांच्या विचारांची कास धरून तांडा वस्ती वाडी गाव तिथं शाखा स्थापन करण्यात येणार असल्याचे विजय साळवे यांनी सांगितले आहे .

शहरातील हॉटेल व्यंकटेश येथे गुरू पोर्णिमेचे औचित्य साधुन स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेच्या वतीने खिरदान कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता या कार्यक्रमात वंचीत चे गंगाधर सोनपसारे यांनी स्वाभिमानी नेते विजय साळवे यांच्या नेतृत्वाखाली स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेत जाहीर प्रवेश केला प्रसंगी पंडित ओव्हाळ बालासाहेब शिंदे अंजेराम घनघाव शेख मजहर वशिष्ठ लांगडे विशाल ससाणे विश्वनाथ तोडके भास्कर पौळ धम्मा गावडे सय्यद अनवर साहेबा टाकणखार आनंद साळवे शेख अर्शद बबन भालेराव राजेश टाकणखार सखाराम चोपडे श्रीधर डोंगरे धैर्यशिल ढगे सोनाजी गायकवाड बाळू साळवे अशोक निकाळजे वैजनाथ गडसिंग ग्यानबा मस्के सिद्धार्थ गाडेकर केशव चोपडे अजय साळवे राहूल मस्के राजु किर्ते चद्रकांत टाकणखार बाबा पोटभरे गौतम सोनपसारे रमेश पौळ विलास खळगे कन्हैय्या बनगे सुरेश साळवे सुमित पोटभरे बाबा खरात यांची उपस्थिती होती.

## बलभीम नगर बुद्ध विहार शिवाजी नगर बीड येथे आषाढी पौर्णिमा व गुरुपौर्णिमा निमित्त बुद्ध आणि त्याचा धम्म ग्रंथ वाचनास प्रारंभ

बीड ।प्रतिनिधी

**भारतीय बौद्ध महासभा शाखा पश्चिम व बलभीम नगर बुद्ध विहार संघर्ष समिती शिवजी नगर पालवन रोड बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी पौर्णिमा निमित्त गुरुपौर्णिमा व बुद्ध आणि त्याचा धम्म ग्रंथ वाचनास सुरुवात केली या कार्यक्रमासाठी बौद्धाचार्य सदाशिव कांबळे सर व प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे शहर शाखेचे ऍड केतनजी गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती सर्व प्रथम अदागर गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर बौद्धचार्य कांबळे सर यांनी त्रिसरण पंचशील व बुद्ध वंदना घेऊन हा विधी संपन्न केला त्या नंतर ऍड केतन गायकवाड यांनी आषाढी पौर्णिमे चे महत्व सांगताना म्हणाले तथागत गौतम बुद्ध यांच्या जीवनामध्ये आषाढ पौर्णिमा व गुरुपौर्णिमा चे महत्व आहे, शाक्याचा राजा शुद्धोधन व माता महामाया यांना बरेच वर्षे मुलबाळ नव्हते आणि हीच उणीव त्यांच्या जीवनात होती. परंतु ह्या पौर्णिमेच्या दिवशी राजा शुद्धोधन व माता महामाया यांच्या सहवास घडला आणि माता महामायेला गरोदर असल्याचे समजले तो हाच आषाढी पौर्णिमा दिवस होता,**

आषाढ पौर्णिमेचे दुसरे महत्व असे कि सिद्धार्थ गौतम जेव्हा २८ वर्षाचे झाले तेव्हा शाक्य आणि कोलिय यांच्या राज्यामध्ये रोहिणी नावाच्या पाण्यासाठी वाद झाला म्हणून तो वाद मिटवणयासाठी सिध्दार्थ गौतम यांनी ग्रहत्याग करून भारद्वाज ऋषींच्या आश्रमात जाऊन प्रवज्जा घेतली . व डोक्यावरील केस काढले , काषाय वस्त्र परिधान करून हातात भिक्षापात्र घेउन ते निघाले . त्या दिवशी देखील आषाढ पौर्णिमा होती.

तिसरे महत्व असे कि गृहत्याग केल्यानंतर अनेक ऋषींच्या आश्रमांत जाऊन ज्ञान संपादन केल्यानंतर त्यांना गया येथे पिंपळाच्या झाडाखाली दिव्या ज्ञान दृष्टी प्राप्त झाली म्हणजेच सिद्धार्थ गौतम सम्यक संबुद्ध झाले . ज्ञान प्राप्त झाल्यावर त्यांनी हे ज्ञान पाच परिव्राजक यांना दिले त्यांची नावे कौंडिण्य, वप्प , भद्दीय, अश्वजीत ,महानाम अशी



आहेत . यांना प्रथम धम्म उपदेश केला त्या दिवशी आषाढी पौर्णिमा होती त्यामूळे यादिवसाला गुरुपोर्णिमा म्हणून ओळखले जाते.

त्यानंतर तथागतांनी वर्षावास प्रारंभ केला .वर्षावास प्रारंभ करण्याचे कारण असे कि पावसाळ्याच्या तीन महिने भिक्षुंना पावसापासून त्रास होऊ नये म्हणजे त्यांचे चीवर भिजू नये ,आणि त्यांना विषारी प्राण्यांपासून इजा होऊ नये त्याकरिता त्यांनी स्थानिक विहारात अथवा स्तूपात राहून तेथील उपासक उपसिकाना धम्माचा उपदेश करावा.

आता घरी गौतम बुद्ध यांच्या जीवनामध्ये आषाढी पौर्णिमेचे महत्त्व पटवून सांगताना ऍड केतन गायकवाड यांनी आपल्या विहारासाठी येणाऱ्या अडीअडचणी तसेच लागणारी मदत भारतीय बौद्ध महासभा तर्फे मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याची सुद्धा हमी दिलेली आहे तसेच भारतीय बौद्ध महासभेचा या विहारामध्ये सुरू झालेल्या ग्रंथ वाचण्यास पाठिंबा असून आपण विविध मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा ग्रंथ वाचनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात होईल व या कार्यक्रमासाठी आपल्या बलिम नगर मित्र नगर शिवाजीनगर भागातील अंजली तेजस वडमारे , अंजली विशाल वडमारे, कू.किरण वडमारे ,सांची वडमारे, मालनबाई अंकुटे, आरोही अंकुटे, कोमल वाघमारे, जानवी वाघमारे, आशा धनवे, सिद्धार्थ वडमारे, गौतम खेमाडे, सचिन वाघमारे, अजय जाधव, आर्यन साळवे, नागेश साळवे, राजू धनवे व बौद्ध उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित राहून बौद्ध धम्म बुद्ध आणि त्याचा धम्म ग्रंथ श्रवण करतील त्यामुळे आपण सुरू केलेल्या या धम्मग्रंथ वाचनाच्या कार्यक्रमास त्यांनी खूप खूप मंगल कामना देऊन आलेल्या सर्व उपासक उपासिका यांना आषाढी पौर्णिमेनिमित्त खूप खूप मंगल कामना दिल्या त्यानंतर ऍड तेजस वडमारे यांनी आभार प्रदर्शन करून आलेल्या बोधाचार्य सदाशिव अण्णा कांबळे सर व प्रमुख पाहुणे ड केतनजी गायकवाड याचे वेळात वेळ काढूण आल्याबद्दल आभार मानले या कार्यक्रमासाठी आयु बबन वडमारे, आयु देविदास राऊत सर, आयु चक्रे सर, आयु वानखेडे बाबा, आयु.हनुमंत कांबळे,आयु अण्णासाहेब शेळके सर, आयु अंकुश चव्हाण सर, आयु मायकल वाघमारे, आयु दिनकर बोराडे साहेब, आयु अर्जुन जवंजाळ साहेब, आयु भास्करजी सरपते, भारतीय बौद्ध महासभा महिला जिल्हाध्यक्ष निसर्गंध ताई, गायकवाड ताई, सरपते ताई, मस्के ताई, ढाका ताई, पारवे ताई, पंडीत ताई, ई.येडे साहेब

## अर्थसंकल्प : विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी टाकलेले सकारात्मक पाऊल, कृषी विकासाला प्राधान्य- धनंजय मुंडे

### कृषी क्षेत्राचा विकास ही देशाची प्राथमिकता असल्याचे यातून सिद्ध होते - धनंजय मुंडे यांची केंद्रीय अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया

मुंबई ।प्रतिनिधी

**केंद्रातील प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील भारत सरकारने पाहिलेल्या विकसित भारताचे स्वप्न साकार करण्याच्या दृष्टीने टाकलेले सकारात्मक पाऊल हा आजचा अर्थसंकल्प आहे. विकसित भारताची पायाभरणी करण्यासाठी कृषी क्षेत्राच्या विकासाला प्राथमिक प्राधान्य देण्यासह आवश्यक असणाऱ्या महत्त्वपूर्ण तरतुदी या अर्थसंकल्पात करण्यात आल्या आहेत अशी प्रतिक्रिया महाराष्ट्राचे कृषिमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते धनंजय मुंडे यांनी आजच्या केंद्रीय अर्थसंकल्पावर व्यक्त केली आहे.**

**केंद्रीय अर्थसंकल्पात ज्या प्रमुख चार घटकांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे त्यामध्ये शेतकरी, गरीब, महिला आणि युवा यांचा प्रामुख्याने समावेश आहे. कृषी क्षेत्रासाठी एक लाख ५२ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून १ फेब्रुवारी, २०२४ रोजी अंतरिम अर्थसंकल्प सादर करण्यात आला, त्यामध्ये १ लाख २७ हजार कोटींची तरतूद करण्यात आली होती. २७ हजार कोटींची ही भरीव वाढ कृषी क्षेत्राच्या दृष्टीने निश्चितच सकारात्मक आहे.**

हवामान बदल संशोधन यावर केंद्र सरकारने लक्ष केंद्रित असून केली असून हवामान बदलांचा परिणाम न होणाऱ्या वाणांचा संशोधन करण्यासाठी मोठी तरतूद केली आहे. तसेच शेतकऱ्यांचे उत्पादकता वाढवण्यासाठी १०९ नवीन वाण व बदलत्या हवामानात तग धरणारे ३२ बागायती वाण उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. पुढील दोन वर्षात एक कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीकडे वळविण्यात येणार आहे. या निर्णयामुळे ग्राहक आणि शेतकरी दोघांच्या गरजा भागवल्या जाणार आहेत.

भाजीपाला उत्पादन आणि मूल्य साखळी तसेच साठवण आणि विपणन व्यवस्थेसाठी शेतकरी उत्पादक कंपनी सहकारी संस्था आणि स्टार्टअप ला प्रोत्साहन देण्यात येणार आहे.पुढील तीन वर्षात शेतकऱ्यांचा आणि शेतजमिनीचा कव्हरेज डिजिटल पब्लिक इन्फ्रा मधून करण्यात येणार आहे. देशातील ४०० जिल्ह्यांना डिजिटल क्रॉप सर्वे मध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. किसान क्रेडिट कार्ड ची संख्या वाढवली जाणार आहे.

चडचए यांना क्रेडिट गॅरंटी दिली जाणार असून याद्वारे कृषी उद्योगांना भरारी मिळेल तसेच या क्षेत्रात रोजगाराची देखील मोठ्या



प्रमाणावर निर्मिती होईल. एकूणच कृषी क्षेत्राचा विकास हीच देशाची प्राथमिकता असल्याचे सिद्ध करणारा हा अर्थसंकल्प असून या अर्थसंकल्पाबद्दल देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जी तसेच अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे मी अभिनंदन करतो अशा शब्दात कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

## देवगिरी प्रतिष्ठान बीडच्या वतीने साहित्यसम्राट डॉ.अण्णा भाऊ साठे राज्यस्तरीय शालेय/आंतर महाविद्यालयीन वकृत्व स्पर्धा

### स्पर्धेत सहभागी व्हा - मुख्य संयोजक प्रा.प्रदिप रोडे यांचे आवाहन

बीड ।प्रतिनिधी

प्रति वर्षाप्रमाणे याहीवर्षी देवगिरी प्रतिष्ठान बीड यांच्या वतीने साहित्यसम्राट डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती निमित्त राज्यस्तरीय शालेय/आंतर महाविद्यालयीन वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दि.११ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १० वाजता सदरील स्पर्धा तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड येथे आयोजित करण्यात आली असून या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत युवक, युवती यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन देवगिरी प्रतिष्ठान बीड संस्थापक अध्यक्ष तथा स्पर्धेचे मुख्य संयोजक प्रा.प्रदीप रोडे यांनी केले आहे.

साहित्यसम्राट डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त देवगिरी प्रतिष्ठान बीड दरवर्षी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करते. सदरील राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा यावर्षी १५ व्या वर्षात पदार्पण करत आहे. साहित्यसम्राट डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याची कर्तृत्वाची चर्चा व्हावी आणि महापुरुषांच्या आदर्शाची परंपरा भावी पिढीसमोर यावी म्हणून देवगिरी प्रतिष्ठान बीड दरवर्षी राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करते. यावर्षी वरिष्ठ गटासाठी स्पर्धेचे विषय १)अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातुन आलेला मानवतावाद.२) फुले,शाहू,आंबेडकरी चळवळीचे वर्तमान. हे विषय असून कनिष्ठ गटासाठी १) जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मज भीमराव. २) संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अण्णाभाऊ साठे यांचे योगदान. हे विषय आहेत. या स्पर्धेत वरिष्ठ गटासाठी प्रथम पारितोषिक रोख रक्कम सात हजार रुपये,स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक रोख रक्कम पाच हजार रुपये, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र तर तृतीय पारितोषिक तीन हजार रुपये, स्मृतिचिन्ह,प्रमाणपत्र असे आहे. उत्तेजनार्थ तीन स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपये रोख रक्कम, स्मृती चिन्ह प्रमाणपत्र तर कनिष्ठ गटासाठी प्रथम पारितोषिक रोख रक्कम पाच हजार रुपये, स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक रोख रक्कम तीन हजार रुपये, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र तर तृतीय पारितोषिक दोन हजार रुपये, स्मृतिचिन्ह,प्रमाणपत्र असे आहे. उत्तेजनार्थ तीन स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपये रोख रक्कम, स्मृती चिन्ह प्रमाणपत्र



देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड, तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन बीड, तुलसी इंग्लिश स्कूल बीड येथे नाव नोंदणी करावी आणि युवक, युवती यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन देवगिरी प्रतिष्ठान बीडचे संस्थापक अध्यक्ष तथा स्पर्धेचे मुख्य संयोजक प्रा. प्रदीप रोडे यांनी केले आहे.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT